रयत शिक्षण संस्थेचे

# सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

(अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालय)

# वाचन प्रेरणा दिन - २०२४

## नोटीस

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या दि. ०९ ऑक्टोबर २०२४ च्या परिपत्रकानुसार **दि. १५ ऑक्टोबर २०२४** रोजी आपल्या महाविद्यालयामध्ये मराठी विभाग व केशवराव पवार मध्यवर्ती ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने **'वाचन प्रेरणा दिनाचे'** आयोजन करण्यात येणार आहे. यासंदर्भात परिपत्रकामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे महाविद्यालयामध्ये खालीलप्रमाणे 'वाचन प्रेरणा दिनाचे' आयोजन करण्यात येणार आहे. तरी सदर कार्यक्रमामध्ये महाविद्यालयामधील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, यांनी सक्रीय सहभाग नोंदविणे अनिवार्य आहे.

- मंगळवार दि. **१५ ऑक्टोबर २०२४** रोजी अधिविभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी यांनी A-1 (11) सभागृहामध्ये सकाळी ठीक १०:३० वा. उपस्थित रहावे. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक दिनानिमित्त राज्याभिषेक सोहळ्याच्या मजकुराचे वाचन सका ळी ठीक १०.४५ ते ११.०० वा. या वेळेत करण्यात येईल. यानंतर ११ ते ११: ४५ या वेळेत श्री अरुण काकडे, जेष्ठ साहित्यिक व लेखक यांचे **“वाचन संस्कृती”** या विषयावर व्याख्यान होईल.
- तरी सदर कार्यक्रमासाठी परिपत्रकामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे महाविद्यालयातील सर्व घटकांची १००% उपस्थिती असणे बंधनकारक आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी. सदर कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमात सहभागी सर्व विद्यार्थ्यांची संख्या, नावनिहाय उपस्थिती, कार्यक्रमाचे छायाचित्रे व कार्यक्रमाची चित्रफित विद्यापीठ प्रशासनाला पाठविण्यात येणार आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी. सदर 'वाचन प्रेरणा दिनाचा' कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्वांनी सांगितलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करावे.

SADGURU GADAGE MAHARAJ COLLEGE KARAD

PRINCIPAL
S. G. M. College, Karad